**<u>ठळक बातम्या</u>**

- दिल्ली स्फोट प्रकरणी तपास यंत्रणांचे देशभरात छापे, मुंब्रा इथून एका संशयिताला अटक

- कालचक्र या जागतिक शांततेसाठी प्रार्थना करण्याच्या बौद्ध उत्सवाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भूतान नरेशांच्या हस्ते उद्घाटन

- शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव आणि अधिकृत निवडणूक चिन्हासंदर्भात आता येत्या २१ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

- साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार 'आभाळमाया' या काव्यसंग्रहासाठी सुरेश सावंत यांना जाहीर

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ५९५ अंकांची वाढ

**<><><><><>**

दिल्ली स्फोट प्रकरणाचा तपास वेगानं सुरू आहे. एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्था आणि सुरक्षा यंत्रणांनी राष्ट्रीय राजधानी क्षेत्र तसंच जम्मू-काश्मीरमधल्या पुलवामा आणि कुलगामसह अनेक ठिकाणी मोठी कारवाई केली. या छाप्यात मोठ्या प्रमाणात स्फोटकं जप्त केली असून, श्रीनगरमधला डॉक्टर तजामुल मलिक याला ताब्यात घेतलं आहे. कुलगाममध्ये जमात-ए-इस्लामी या प्रतिबंधित संघटनेच्या ठिकाणांवर छापा टाकण्यात आला.

या स्फोटात वापरलेली कार अमित नावाच्या डीलरकडून खरेदी केली होती, त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

या प्रकरणातली संशयित डॉ शाहीन शाहीद हिचा भाऊ परवेझ अन्सारी याच्या लखनौमधल्या घरावर उत्तर प्रदेश एटीएसनं कारवाई केली असून तिथून मोबाईल फोन्स सह इतर यंत्रसामुग्री जप्त केली.

महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकानं मुंब्रा इथून एका संशयिताला अटक केली आहे. त्याच्या घरातून अनेक इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल उपकरणं जप्त केली असून त्यांचा तपास केला जात असल्याचं एटीएसनं सांगितलं.

**<><><><><>**

भूतानचा दोन दिवसांचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परतले. प्रधानमंत्र्यांनी आज भूतान नरेश जिग्मे खेसार नामग्येल वांगचुक यांच्यासह आज थिंपू इथं कालचक्र उत्सवाचं उद्घाटन केलं. हा जागतिक शांततेसाठी प्रार्थना करण्याचा बौद्ध पारंपरिक उत्सव बौद्ध धर्मगुरु, ‘जे खेनपो’ यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. या दौऱ्यात मोदी यांनी वांगचुक यांच्याशी द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा केली. दिल्लीतल्या स्फोटात झालेल्या जीवितहानीबद्दल राजे वांगचुक यांनी शोकसंवेदना व्यक्त केली.

भूतानच्या ऊर्जा प्रकल्पांसाठी सवलतीच्या दरान ४० अब्ज रुपये पतपुरवठा करण्याची घोषणा मोदी यांनी काल केली. नवीकरणीय ऊर्जा, आरोग्य अशा महत्त्वाच्या क्षेत्रात ३ सामंजस्य करारांवर प्रधानमंत्र्यांच्या या दौऱ्यात स्वाक्षऱ्या झाल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज भूतानचे प्रधानमंत्री दाशो त्शेरिंग तोबगे यांच्याशीही चर्चा केली.

**<><><><><>**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं नाव आणि अधिकृत निवडणूक चिन्हासंदर्भात आता येत्या २१ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या संदर्भातली सुनावणी येत्या २ डिसेंबरला होणार होती. मात्र,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर सुनावणी लवकर घेण्याची विनंती उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षांनी केली होती. त्यावर आज न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्यापीठासमोर सुनावणी झाली. पुढची सुनावणी २१ जानेवारीला होईल, असं न्यायालयानं सांगितलं

<><><><><>

रत्ने आणि आभूषणे क्षेत्रासाठी राज्यशासनानं नवीन धोरण जाहीर केलं आहे. मंत्रिमंडळानं मंजूर केलेल्या या धोरणाचा शासननिर्णय आज जारी झाला. या क्षेत्रात पुढच्या ५ वर्षांच्या कालावधीत एक लाख कोटी रुपये गुंतवणूक  ५ लाख रोजगार निर्मितीचं उद्दिष्ट ठेवलं आहे. देशाच्या एकूण रत्न आणि आभूषण क्षेत्रात महाराष्ट्राचा वाटा १८ टक्के आहे.

या क्षेत्रात कौशल्य प्रशिक्षण, नवोन्मेष, रोजगारनिर्मिती, व्यवसाय सुलभता इत्यादींना चालना देण्यात येणार असून त्याकरता चालू आर्थिक वर्षात १०० कोटी रुपये अर्थसंकल्पीय तरतूद असेल. २०३० पर्यंत या धोरणाचा कालावधी असून तोपर्यंत त्याअंतर्गत प्रोत्साहनांवर १ हजार ६५१ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

<><><><><>

आज सार्वजनिक प्रसारण सेवा दिवस आहे. १९४७ मधे फाळणीनंतर भारतात आलेल्या विस्थापितांना याच दिवशी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी  ऑल इंडिया रेडियोवरुन संबोधित केलं होतं. या ऐतिहासिक भाषणाची आठवण म्हणून १२ नोव्हेंबर हा दिवस सार्वजनिक प्रसारण सेवा दिन म्हणून साजरा केला जाईल असं सन २००० मधे तत्कालीन माहिती आणि प्रसारण मंत्री सुषमा स्वराज यांनी घोषित केलं. आज यानिमित्त नवी दिल्लीच्या आकाशवाणी केंद्रात बापू स्टुडियो इथं भक्तीगीत गायनाचा कार्यक्रम झाला. प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सैगल कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

साहित्य अकादमीतर्फे देण्यात येणाऱ्या बालसाहित्यासाठीच्या पुरस्कारासाठी यंदा सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' या काव्यसंग्रहाची निवड झाली आहे. मराठीसह २४ भाषांमधल्या साहित्यकृतींना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. ५० हजार रुपये आणि ताम्रपट अशा स्वरुपाचा हा पुरस्कार येत्या शुक्रवारी म्हणजे १४ नोव्हेंबरला नवी दिल्लीत साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात येईल असं केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने कळवलं आहे.

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजारांत आज सलग तिसऱ्या दिवशी तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ५९५ अंकांची वाढ झाली आणि तो ८४ हजार ४६७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १८१ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ८७६ अंकांवर बंद झाला. आज आयटी क्षेत्रासह, बंदरे, दूरसंचार अशा क्षेत्रात तेजी दिसून आली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि बोत्सवानाचे अध्यक्ष डुमा गिडॉन बोको यांच्यात आज द्विपक्षीय चर्चा झाली. यात दोन्ही नेत्यांनी व्यापार आणि गुंतवणूक, शेती, अक्षय्य ऊर्जा, आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, संरक्षण आणि डिजिटल तंत्रज्ञान यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर सहमती दर्शवली. आरोग्य सेवा आणि औषध निर्माण सहकार्यासाठी यावेळी करार करण्यात आला. बोत्सवानाला एआरव्ही औषधं देण्याची घोषणाही यावेळी राष्ट्रपतींनी केली. या करारामुळे आरोग्य सेवेतली समस्या दूर होऊन बोत्सवानाला परवडणाऱ्या औषधांचा पुरवठा सुलभ होईल, असं डुमा गिडॉन बोको म्हणाले.

यावेळी प्रोजेक्ट चित्ताची घोषणा करण्यात आली. या अंतर्गत बोत्सवाना भारताला आठ चित्ते भेट म्हणून देणार आहे.

<><><><><>

ढाका इथं झालेल्या आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत कंपाउंड मिश्र प्रकारात भारताच्या अभिषेक वर्मा आणि दीपशिखा यांनी कझाकस्तानचा १५६-१५३ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. सुवर्ण पदकासाठी उद्या भारताचा सामना बांगलादेशाशी होईल. रिकर्व्ह प्रकाराच्या सांघिक स्पर्धेत अंशिका कुमारी आणि यशदीप भोगे परवा कोरियाविरुद्ध कांस्य पदकासाठी लढत देतील.

<><><><><>

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईत चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांसाठी सर्व विभागांनी सूक्ष्म नियोजन करावं असे निर्देश मुख्य सचिव राजेश कुमार यांनी दिले. महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी आणि शिवाजी पार्क इथल्या व्यवस्था ठरवण्यासाठी आज मंत्रालयात बैठक झाली. चैत्यभूमी परिसरात मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, तसंच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दादर आणि आसपासच्या परिसरात वाहतूक पोलीस यंत्रणांनी रहदारीचं योग्य नियोजन आणि नियंत्रण करावं. अनुयायांसाठी जागोजागी सूचना फलक लावावेत, असं राजेश कुमार यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

ज्येष्ठ अभिनेता धर्मेंद्र यांना रुग्णालयातून घरी सोडलं असल्याचं मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयाच्या डॉक्टरांनी आज सांगितलं. धर्मेंद्र यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असून, माध्यमांनी आणि जनतेनं अफवांपासून दूर राहावं आणि आपल्या कुटुंबाचा खासगीपणा जपावा, अशी विनंती त्यांच्या कुटुंबीयांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. सर्वांचं  प्रेम आणि शुभेच्छा याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

<><><><><>

मुंबईत पवई इथे सेप्टिक टँकमध्ये गुदमरून एका कामगाराचा मृत्यू झाला असून अन्य एक कामगार अत्यवस्थ आहे. पवई इथल्या सांडपाणी प्रकल्पातल्या सेप्टिक टँकमध्ये हे दोन कामगार सफाईसाठी उतरले होते. मात्र, सेप्टिक टँकमधल्या गॅसमुळे त्यांना त्रास होऊ लागला. त्यामुळे त्यांना ताबडतोब रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यापैकी एका कामगाराचा मृत्यू झाला असून दुसऱ्यावर उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

पक्षी अभ्यासक डॉ. सलीम अली यांच्या स्मरणार्थ दर वर्षी १२ नोव्हेंबर हा त्यांचा जन्म दिवस राष्ट्रीय पक्षी दिवस म्हणून साजरा केला जातो. डॉ. सलीम अली यांनी देशभरात पक्षी सर्वेक्षणाचं काम केलं आणि पक्षी अभ्यासाला चालना दिली.

नोव्हेंबर महिन्यात थंडीची चाहूल लागल्यावर बुलडाणा जिल्ह्यात अनेक पक्षी प्रजननासाठी नैसर्गिक आणि कृत्रिम घरट्यांमध्ये आश्रय घेतात. पक्षी संवर्धनासाठी काम करणारे संजय गुरव यांनी बनवलेल्या कृत्रिम घरट्यांमध्ये यंदा विविध पक्षी पाहायला मिळत आहेत.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात किमान तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं ९ पूर्णांक १ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**